# मराठा रत्नांचा सुगंध चौफेर दरवळावा : तनपुरे महाराज

✔ सुराज्य/सोलापूर



मराठा सेवा संघाने निवडलेली मराठा रत्ने कोंदणात न ठेवता या रत्नांचा सुगंध चौफेर दरवळावा अशी अपेक्षा ह. भ. प. बद्रीनाथ तनपुरे महाराज यांनी व्यक्त केली.

मराठा सेवा संघाच्या वतीने प्रतिवर्षी देण्यात येणाऱ्या मराठारत्न पुरस्कारांचे वितरण डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात झाले. यावेळी तनपुरे महाराज बोलत होते. यावेळी व्यासपीठावर बार्शीचे शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव, पुरस्कार वितरण समितीचे अध्यक्ष जी. के देशमुख, सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील, शहराध्यक्ष सदाशिव पवार, कोषाध्यक्ष आर. पी. पाटील, लक्ष्मण महाडिक, कल्याण गव्हाणे, तानाजी चटके, सामंत पवार, सोमनाथ राऊत, नंदाताई शिंदे, अभिंजली शिंदे उपस्थित होते.

यावेळी आशीर्वादपर भाषणात तनपुरे महाराज यांनी रत्नांची पारख करणे साधी गोष्ट नाही. संस्कारानंतरच रत्ने घडत असतात अशा रत्नांचा शोध मराठा सेवा संघाने घेतला आहे. आता या रत्नांना कोंदणात न ठेवता या रत्नांचा सुगंध चौफेर दरवळला गेला पाहिजे. ही जबाबदारी प्रत्येक समाज बांधवांची असल्याचे मत तनपुरे महाराज यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात बी. वाय यादव यांनी नवीन येणाऱ्या शिक्षण धोरणाचे आत्मचिंतन करत शिक्षणाचे नवे मार्ग स्वीकारले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रारंभी राष्ट्रमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे पूजन करून जिजाऊ वंदना घेण्यात आली. त्यानंतर सेवासंघाचे जिल्हाध्यक्ष प्रशांत पाटील यांनी प्रास्ताविक भाषणातून पुरस्कार देण्याबाबतची भूमिका विषद केली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते अनिल रामचंद्र फाळके (राज्यस्तरीय शैक्षणिक पुरस्कार), ऋतुजा राजन पाटील (युवती पुरस्कार), दत्तात्रय संदिपान मुळे (उद्योजकता), राजेंद्र कुंडलीक हजारे (सहकार) अरूण परशुराम पाटील (सामाजिक) प्रकाश मधुसूदन काटुळे (क्रीडा) पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. शाल श्रीफळ स्मृती चिन्ह, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्कार प्राप्त ऋतुजा पाटील, अरूण पाटील, अनिल फाळके यांनी सत्कारास उत्तर दिले.

यावेळी माजी आ. राजन पाटील, शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे, राजन जाधव, राजश्री पाटील, सूर्यकांत पाटील, प्रकाश चवरे, अनिल कादे यांच्यासह जिल्हा परिषदेच्या उपमुख्यकार्यकारी अधिकारी चंचला पाटील पंढरपूरचे प्रांत गजानन गुरव, उत्तम सुर्वे, यांच्यासह समाज बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्वेता हुल्ले यांनी केले तर आभार सदाशिव पवार यांनी मानले.

# कार्तिकी एकादशीची महापूजा फडणवीस यांच्या हस्ते होणार

✔ सुराज्य/पंढरपूर

कार्तिकी एकादशीची श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची महापूजा राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्यासाठी मंदिर समितीच्या वतीने त्यांना निमंत्रण देण्यात येणार आहे. आज श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीची बैठक झाली. त्यामध्ये हा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमिवर नवीन भक्त निवास येथे मंदिर समितीची बैठक पार पडली. यास समितीचे सदस्य मधवीताई निगडे, शिवाजी महाराज मोरे, प्रकाश महाराज जवंजाळ, ज्ञानेश्वर महाराज जळगाकर, संभाजी शिंदे, शकुंतला नडगिरे, अतिरीक्त जिल्हाधिकारी तथा कार्यकारी अधिकारी संजीव जाधव, व्यवस्थापक बालाजी पुदलवाड आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सुचनेनुसार संपूर्ण पंढरपूर शहर व पालखी मार्गा पर्यंत एकच आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर आराखड्याचे काही दिवसांपूर्वी सादरीकरण करण्यात आले असून यामध्ये दर्शन मंडप पाडण्याचा प्रस्ताव देण्यात आला आहे. मात्र आजच्या मंदिर समितीच्या बैठकीमध्ये औसेकर महाराज यांनी सदर दर्शन पाडण्याचा कोणताही ठराव समितीने केला नसल्याचे सांगितले. सदर दर्शन मंडप पाडण्याबाबत प्रशासनाने मंदिर समितीशी कोणतीही चर्चा देखील केली नाही. सदर दर्शन उभारण्यासाठी शेकडो भाविकांनी देणग्या दिल्या असून प. पू. डोंगरे महाराज यांच्या सारख्या थोर विभुतींनी आपले योगदान दिले आहे. यामुळे सदर दर्शन मंडप पाडण्यापेक्षा यामध्ये आवश्यक त्या सुधारणा कराव्यात अशी आमची सूचना आहे. याबाबत जिल्हाधिकारी यांच्या बरोबर चर्चा करणार असल्याचे औसेकर महाराज यांनी सांगितले.

काही दिवसांपूर्वी मंदिरात भजन, किर्तन करण्यास बंदी करण्यात आली होती. हा निर्णय घेताना तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी पूर्वीच मंदिर समितीने असा ठराव केला असल्याचे कारण दिले होते. मात्र आज औसेकर महाराज यांनी, असा कोणताही ठराव आमच्या समितीने किंवा पूर्वीच्या समितीने केला नसल्याचा दावा केला. तसेच यापुढे देखील कोणतीही समिती असा ठराव करणार नाही. कारण मंदिरातील परंपरेचे जतन करणे हे आमचे कर्तव्य असल्याचे सांगितले.



# युटोपियन शुगर्स गळीत हंगामाचा शुभारंभ

**कामगारांना १२.५० टक्के दिवाळी बोनस; ७.५१ लाख मे. टन गाळपाचे उद्दीष्ट**

✔ सुराज्य/मंगळवेढा

युटोपियन शुगर्स लि. या कारखान्याकडे मागील गळीत हंगाम २०२१-२२ मध्ये गाळप झालेल्या ऊसास प्रती मे. टन २०० रु. प्रमाणे ऊस दर देणार असून कर्मचारी बांधवांचे कारखाना उभारणीत योगदान महत्वाचे आहे. . त्यांची दिवाळी ही गोड व्हावी या करीता त्यांना ही १२. ५० टक्के दिवाळी बोनस देणार आहे. एफआरपी पेक्षा जास्तीचा दर देण्याची परंपरा कायम राखत असल्याची महत्वपूर्ण घोषणा कारखान्याचे चेअरमन उमेश परिचारक यांनी केली आहे.

युटोपियन शुगर्स च्या ९ व्या व गळीत हंगाम २०२२-२३ चा शुभारंभ सोमवारी करण्यात आला, त्यावेळी परिचारक बोलत होते. यावेळी कारखान्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन परिचारक, ऋषिकेश परिचारक यांचे समवेत सर्व खाते प्रमुख, कर्मचारी व कामगार बांधव मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

परिचारक म्हणाले की, कारखाना ९ व्या गळीत हंगामास पूर्ण क्षमतेने सामोरे जात आहे. मागील वर्षी युटोपियन ने उच्चांकी गाळप केले होते. चालू वर्षी कारखान्याने विस्तारीकरण करून प्रतिदिन ५२०० मे. टन गाळप करण्याचा मानस ठेवला आहे. सर्व यंत्रणा अद्यावत केली आहे. मात्र, सततच्या पावसामुळे चालू गळीत हंगाम ८ -१० दिवस उशिराने चालू होत आहे. हंगामाच्या सुरूवातीला जास्तीचा पाऊस झाल्याने रिकव्हरी कमी लागत असते. तरी सुध्दा चालू गळीत हंगाममध्ये मागील सर्व गाळपाचे रेकॉर्ड मोडीत काढून नवा उच्चांक प्रस्थापित करण्याचा आमचा मानस असून आहे. चालू गळीत हंगामा मध्ये प्रतीदिन ६० हजार लिटर इथेनॉल उत्पादन करण्याचा मानस आहे. गळीत हंगामा मध्ये गाळपास आलेल्या ऊसास प्रती मे. टन २०० रु. प्रमाणे दिवाळी भेट म्हणून देणार आहे. कारखान्याने या पूर्वीच २१०० रु प्रमाणे रक्कम ऊस उत्पादक यांना अदा केलेली आहे. कारखान्याची एकूण एफआरपी ही २१८० रु. आहे. त्यामुळे मागील गळीत हंगाम मध्ये गाळप केलेल्या ऊसास प्रती मे. टन १२० रु. इतका दर हा एफआरपी पेक्षा जास्तीचा दर होत आहे. कामगार वर्गाची भूमिका महत्वाची असते. त्यांची ही दिवाळी गोड व्हावी या करीता १२. ५०% दिवाळी बोनस देण्यात येणार आहे. तसेच ऊस उत्पादक यांनाही दिवाळी करीता सवलतीच्या दरात युटोपियन च्या सर्व विभागीय कार्यालातून साखर वाटप करण्यात येणार असल्याचे ही परिचारक यांनी संगीतले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार लक्ष्मण पांढरे यांनी केले.

# महापालिका शाळेतील विद्यार्थिनींना लवकरच मिळणार प्रत्येकी २२० रुपये उपस्थिती भत्ता

**सहा महिन्यांच्या ३.८६ लाख रुपये निधीची तरतूद**

✔ सुराज्य/सोलापूर

सोलापूर महापालिका महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत प्रोत्साहन म्हणून महापालिका शाळेतील १ हजार ७५८ विद्यार्थिनींना यावर्षीच्या सहा महिन्याचा शाळा उपस्थिती भत्ता लवकरच मिळणार आहे. त्यासाठी ३ लाख ८६ हजार ७६० रुपये निधी तरतूद करण्यात आली आहे. प्रत्येक विद्यार्थिनीस २२० रुपये उपस्थिती भत्ता या आठवड्यात मिळणार आहे.

महापालिका महिला व बालकल्याण विभागांतर्गत विविध १७ नावीन्यपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. त्यापैकी सोलापूर महापालिका प्राथमिक शिक्षण मंडळाच्या अंतर्गत असलेल्या महापालिकेच्या विविध माध्यमांच्या शाळांमधील विद्यार्थिनींना प्रोत्साहन म्हणून दररोज २



रुपये प्रमाणे शाळा उपस्थिती भत्ता शासन नियमानुसार देण्याची योजना आहे.

या योजनेअंतर्गत महापालिकेच्या विविध माध्यमांच्या एकूण ६१ शाळांमधील १हजार ७५८ विद्यार्थिनींना हा शाळा उपस्थिती भत्ता या शैक्षणिक वर्षात मिळणार आहे. दरम्यान. दररोज दोन रुपये प्रमाणे हा उपस्थिती भत्ता देण्यात येणार आहे. महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने सहाय्यक आयुक्त पुष्पगंधा भगत यांच्याकडे आवश्यक निधी संदर्भात प्रस्ताव पाठविण्यात आला. त्या तरतुदीस मंजुरी देण्यात आली आहे.

यावर्षी माहे जून ते नोव्हेंबर या ६ महिन्याचा नियमानुसार रोज २ रुपये प्रमाणे प्रत्येक विद्यार्थिनीस २२० रुपये उपस्थिती भत्ता देण्यात येणार आहे. शासन नियमानुसार एकूण २२० दिवसाचे शैक्षणिक वर्ष असते. त्याप्रमाणे ६ महिन्यांत ११० दिवस शाळा असते. माहे जून ते नोव्हेंबर २०२२ या सहा महिन्यातील ११० दिवसाप्रमाणे दररोज २ रुपये असे एकूण २२० रुपये शाळा उपस्थिती भत्ता या विद्यार्थिनींना मिळणार आहे, अशी माहिती महापालिका महिला व बालकल्याण विभागाचे अधिकारी विठ्ठल कस्तुरे यांनी दिली.

महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप व आयुक्त पी शिवशंकर यांची बजेट अभिप्राय मान्यता घेऊन येत्या आठ दिवसात प्रत्येक विद्यार्थिनी २२० रुपये सहा महिन्याचा उपस्थिती भत्ता देण्यात येणार आहे. या दिवाळीनिमित्ताने विद्यार्थिनींना उपस्थिती भत्त्याच्या रूपाने ही भेट मिळणार आहे.

## पाय घसरून पडल्याने वृध्देचा मृत्यू

✔ सुराज्य/सोलापूर : घरात पाय घसरून पडून जखमी झालेल्या रुक्मिणी भगवान सुतार (वय ८५ रा, माळाशीरस) या सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना सोमवारी सकाळी मरण पावल्या.

त्या १४ ऑक्टोबर रोजी राहत्या घरात पाय घसरून जखमी झाल्या होत्या. त्यांना अकलूज येथे प्राथमिक उपचार करून बेशुध्द अवस्थेत सोलापुरात व्यंकटेश (नातू) यांनी दाखल केले होते. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.

## मुंगशी येथे आत्महत्येचा प्रयत्न

मुंगशी (ता. मोहोळ) येथे शेतात काम करताना विष प्राशन केल्याने सीमा सुनील पवार (वय २० मूळ रा. जळगाव) ही जखमी झाली. ही घटना सोमवारी सकाळी घडली. तिला वैराग येथे प्राथमिक उपचार करून सुनील (पती) यांनी दाखल केले. यामागचे कारण समजले नाही. तालुका पोलिसात याची नोंद झाली आहे.



# मार्कंडेय रुग्णालयावर सत्ताधाऱ्यांचे वर्चस्व

✔ सुराज्य/सोलापूर

पूर्व भागातील मार्कंडेय सोलापूर सहकारी रुग्णालयाच्या निवडणुकीत अखेर सत्ताधारी सहकार पॅनलने बाजी मारली. त्यांनी आपले निर्विवाद वर्चस्व पुन्हा सिध्द केले. रुग्णालयाचे प्रेसिडेंट सत्यनारायण बोल्ली यांच्यासह कुचन-सादूल-बोमड्याल गटासाठी ही निवडणूक प्रतिष्ठेची होती. सत्ताधाऱ्यांविरोधात परिवर्तन पॅनलने आव्हान दिले होते, मात्र मतदारांनी सत्ताधाऱ्यांनाच कौल दिल्याने पुन्हा मार्कंडेय रुग्णालयावर सत्ताधाऱ्यांची सत्ता आली आहे.

कुचन हायस्कूल आवारातील डी. आर. इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये मतमोजणीची प्रक्रिया पार पडली. यामध्ये सत्ताधारी पॅनलचे सर्व उमेदवार विजयी झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी ए. ए. गावडे यांनी घोषित केले. या निवडणुकीत संस्था मतदारसंघात रुग्णालयाचे माजी व्हाईस चेअरमन, विद्यमान संचालक तसेच माजी नगरसेवक अविनाश बोमड्याल हे सर्वाधिक १०२ मते घेऊन विजयी झाले. याबद्दल त्यांनी सर्व सभासदांचे आभार व्यक्त केले.

### विजयी उमेदवार

वैयक्तिक मतदारसंघातून लक्ष्मीनारायण कुचन, श्रीनिवास कमटम, अशोक आडम, राजेशम येमूल, पार्वतय्या श्रीराम, संस्था मतदारसंघातून अविनाश बोमड्याल, रमेश विडप, इरेशम कोंपेल्ली, मनोहर अन्नलदास, विनायक कोंड्याल तर ओबीसी मतदारसंघातून सुरेश फलमारी हे विजयी झाली.

### पराभूत उमेदवार

या निवडणुकीत परिवर्तन पॅनलचे सर्व उमेदवार पराभूत झाले. यामध्ये मनोहर इगे, गणेश पेनगोंडा, ॲड, राजगोपाल विडप, व्यंकटेश दोंता, श्रीनिवास कोंडा (वैयक्तिक मतदारसंघ), नागेश वल्याळ, श्रीहरी इराबत्ती (संस्था मतदारसंघ), नागेश वल्याळ (ओबीसी मतदारसंघ) यांचा समावेश आहे.

# दिवाळीपूर्वी तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय द्या

**माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांची महसूलमंत्र्यांकडे मागणी**

✔ सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील सर्व मंडलातील विमाधारक शेतकऱ्यांना खरीपातील सर्व पिकांच्या जोखमेपोटी विमा कंपनीकडून दिवाळीपूर्वी ग्रिम रक्कम देण्याविषयी आदेश द्यावेत अशी मागणी माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी राज्याचे महसूलमंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्याकडे केली.



याविषयी बोलताना सिध्दाराम म्हेत्रे म्हणाले की, अक्कलकोट तालुक्यातील बहुतांश शेतकऱ्यांचे संपूर्ण वर्षाचे अर्थकारण खरीप पिकांवर अवलंबून आहे. मात्र यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील खरीप हंगामातील सोयाबीन, तूर, भुईमूग, उडीद, मूग यासह इतर पिकांचे अतोनात नुकसान झाल्याने शेतकरी अडचणीत आले आहेत. जिल्हा कृषी कार्यालयाकडुन जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने अक्कलकोट तालुक्यातील फक्त मैंदर्गी, वागदरी व अक्कलकोट महसूल मंडलातील भुईमूग पिकासाठी विमा कंपन्यांनी ग्रिम स्वरूपात रक्कम देण्याविषयी आदेश देण्यात आले आहेत. वास्तवात संपूर्ण अक्कलकोट तालुक्यात मोठे नुकसान झाल्याने खरीपातील सर्व पिकांच्या जोखमेपोटी विमा कंपनीकडून दिवाळीपूर्वी ग्रिम स्वरूपात रक्कम देण्याविषयी आदेश द्यावेत यासाठी महसूलमंत्र्यांकडे निवेदन दिल्याचे सिध्दाराम म्हेत्रे यांनी सांगितले. यावेळी कॉंग्रेसचे शहराध्यक्ष प्रकाश वाले उपस्थित होते.

अक्कलकोट तालुक्यातील सर्व मंडळातील शेतकऱ्यांना पीक विम्याची ग्रीम रक्कम मिळावी यासाठी सिध्दाराम म्हेत्रे यांनी निवेदन दिल्यानंतर लागलीच महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोलापूरचे जिल्हाधिकारी यांना याबाबत तातडीने संपर्क साधणार असल्याचे स्पष्ट केले. दिवाळीपूर्वी अक्कलकोट तालुक्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आवश्यक सहकार्य करणार असल्याचे आश्वासन दिले.

# महापालिका कर्मचाऱ्यांना मिळणार २,७५० रुपये सानुग्रह

**९ हजार ॲडव्हान्स जाहीर**

✔ सुराज्य/सोलापूर

दीपावली निमित्ताने महापालिका कर्मचाऱ्यांना यंदा पावणेतीन हजार रुपये सानुग्रह अनुदान तर ९ हजार रुपये ॲडव्हान्स रक्कम मिळणार आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा या दोन्ही रक्कमेत महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी वाढ केली आहे. महापालिका मुख्य लेखापाल यांच्या स्वाक्षरीने याबाबतचे परिपत्रक जारी केले आहे.

सोलापूर महापालिका कर्मचाऱ्यांची संख्या सुमारे पाच हजार इतकी आहे. दिवाळीनिमित्त सानुग्रह अनुदान आणि ॲडव्हान्स रक्कम देण्याबाबत महापालिका कामगार संघटना कृती समिती व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनने यापूर्वी महापालिका आयुक्तांना निवेदन दिले होते. गत वर्षाच्या तुलनेत यंदा सानुग्रह अनुदान व ॲडव्हान्सच्या रक्कमेत वाढ करण्याची मागणी संघटनांनी केली होती. त्याची दखल घेत प्रशासनाने गत वर्षाच्या तुलनेत जास्त रक्कम देण्याचा निर्णय घेतला आहे. कर्मचाऱ्यांवर सातत्याने कारवाईचा बडगा आयुक्त उचलत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सूर होता मात्र या दोन्ही रकमा वाढीव जाहीर महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी कर्मचाऱ्यांना हा सुखद धक्का दिला आहे. मागील वर्षी अडीच हजार रुपये सानुग्रह अनुदान मिळाले होते. यंदा त्यात अडीचशे रुपयांची वाढ होऊन पावणेतीन हजार इतके सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे. तर गतवर्षी साडेसात हजार रुपयांचा ॲडव्हान्स रक्कम दिली होती. यंदा त्यामध्ये दीड हजारांची वाढ करुन ९ हजार रुपये देण्याचे ठरले आहे. याबाबतचे परिपत्रक मुख्य लेखापालांच्या स्वाक्षरीने काढण्यात आले आहे.

### ना मामूसे नकटा मामू सही असा प्रकार : जानराव

संघटनेने केलेल्या निवेदनाप्रमाणे ही वाढ झाली नाही. अनुदानात केवळ २५० रुपये वाढ करू आयुक्तांनी दानत किती आहे, ते कळली आहे. आम्ही एक महिन्याच्या पगाराइतके अनुदान मिळावे, राज्य सरकारच्या निमयामनुसार १२ हजार द्यावे, अशी आमची मागणी होती. ना मामू से नकटा मामू सही असा प्रकार आयुक्तांनी केला आहे. आमचा अपेक्षाभंग झाला झाल्याची प्रतिक्रिया कामगार संघटना कृती समितीचे अध्यक्ष कामगार नेते अशोक जानराव यांनी दिली आहे.

### वाढीचा निर्णय स्वागतार्हच : अध्यक्ष सदाफुले

काही वर्षांपूर्वी महापालिका कर्मचाऱ्यांना दिवाळीनिमित्त रकमा देण्यास स्पष्ट नकार मिळाला होता, परंतु यंदा आयुक्त पी शिवशंकर यांनी या रकमांमध्ये वाढ करण्याचा निर्णय घेतला. यामुळे संघटनेच्या मागणीप्रमाणे आयुक्तांनी केलेली वाढ स्वागतार्ह आहे. यामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. त्याबद्दल पालिका आयुक्तांचे आभार !, अशी भावना महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर ट्रेड युनियनचे अध्यक्ष बापूसाहेब सदाफुले यांनी व्यक्त केली आहे.